## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

शिरडी ४२३ १०९.

तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर

दुरध्वनी क्रमांक (०-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,

फॅक्स क्रमांक -०२४२३-२५८८७०

Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.purchase@sai.org.in

**मुंबई कार्यालय** - साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर

मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३


# नवीन दर्शनरांगेकरीता कॅन्टीन व फायर ॲण्ड सेफ्टी विभागासाठी फर्निचर पुरविणेची ई-निविदा

**A. निविदेचा तपशिल- श्री साईबाबा संस्थानचे नवीन दर्शनरांगेकरीता कॅन्टीन व फायर ॲण्ड सेफ्टी विभागासाठी फर्निचर पुरविणेबाबत ई-निविदा**

**B. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे वगैरे तपशील खालीलप्रमाणे-**

१. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अद्ययावत दुकान नोंदणी दाखला / स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला / तत्सम शासकीय परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

२. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

३. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

**C. पुरवठा करावयाच्या साहित्याचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम-**

१. श्री साईबाबा संस्थानचे नवीन दर्शनरांगेकरीता कॅन्टीन व फायर ॲण्ड सेफ्टी विभागासाठी फर्निचर पुरविणेबाबत तांत्रिक स्पेसिफीकेशनसह सर्व तपशील BOQ मध्ये दिलेला आहे. त्याचा दर भरतांना निविदाधारकाने विचार करावा.

२. निविदा फी रक्कम रु.१,७००/- (रुपये एक हजार सातशे) व बयाणा रक्कम रु.८,५००/- (रुपये आठ हजार पाचशे) मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. **MSME अंतर्गत निविदा फी व बयाणा रक्कम न भरण्याची सवलत या निविदेला लागू नाही. सर्व निविदाधारकांनी निविदा फी व बयाणा रक्कम भरणे अनिवार्य आहे.**

**D. निविदाधारकांसाठी सुचना-**

१. सदर निविदा दि. १०/११/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि. २३/११/२०२३ सायं. ०५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

२. पुरवठा करावयाचे फर्निचर साहित्याचा तपशील BOQ मध्ये दिलेले आहे. ते निविदाधारकाने विचारात घ्यावे. सदर निविदा Online सादर करावयाची आहे.

३. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

४. शक्य झाल्यास दि.२५/११/२०२३ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. तांत्रिक बीडध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील निविदेत दिलेला आहे. ती सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडावीत. तांत्रिक निविदेतील पात्र झालेल्या निविदाधारकांचेच कमर्शिअल बीड विचारात घेण्यात येईल.

५. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमध्ये नमूद करावेत म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी शक्य असल्यास उपस्थित राहावे.

**E. निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-**

१. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना GST-TDS,TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर तसेच पॅकिंग व फॉरवर्डिंग खर्च,जकात,वाराई, हमाली वगैरे सर्व खर्चासह शिर्डी संस्थानचे भांडार/ कॅन्टीन / फायर अॅण्ड सेफ्टी विभागामध्ये पोहोचचे वाहतूक खर्च या सर्व बाबींचा विचार करावा व ऑनलाईन दर भरतांना सर्व खर्चासह दर भरावेत.

२. संस्थानकडून कुठलाही इतर खर्च वेगळा दिला जाणार नाही.

३. शासन नियमानुसार सध्या लागू असलेले व वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु / सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% GST-TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रमांक २०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची अधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

४. पुरवठादाराने online निविदेत दर भरतांना काळजी पुर्वक भरावेत. दर भरतांना त्याची बाजारातील उपलब्धता पाहूनच दर भरावेत. नजरचुकीने दर भरले आहेत अशा सबबी पुरवठा आदेश दिलेनंतर विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**F. ऑनलाईन निविदा उघडण्याची कार्यपध्दती-**

१. निविदेचा Download कालावधी संपल्यानंतर खरेदी समितीचे सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथम उघडण्यात येतील. त्यानंतर तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांचेच कमर्शिअल बीड उघडण्यात येतील.

२. कमर्शियल बीड उघडण्यात येऊन निविदाधारकांच्या Item wise दरांचा तुलनात्मक दृष्ट्या विचार करण्यात येईल व त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.

**G. साहित्य पुरवठा करावयाचे ठिकाण-**

१. निविदेत नमूद केलेल्या साहित्याचा पुरवठा शिर्डी येथील संस्थानचे भांडार/ कॅन्टीन / फायर अॅण्ड सेफ्टी विभागामध्ये अगर बायपास रोडवरील संस्थानच्या गोडावूनमध्ये पॅकींग व फॉरवर्डीग, साहित्य उतरवण्याची वाराई, हमालीसह करावा लागेल.

**H. सुरक्षा अनामत रक्कम -**

१. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत सदर साहीत्याचा पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून संस्थानकडे ठेवावी लागेल. निविदा मंजूर झाल्याचे कळविलेनंतर सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या सदर साहित्याचा पुरवठा केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर व्याज मिळणार नाही. निविदेत L१ नसलेल्या निविदाधारकांची बयाना रक्कम परत केली जाईल. निविदेत L१ असलेल्या निविदाधारकांची बयाना रक्कम ३% सुरक्षा अनामत रक्कमेमध्ये वर्ग केली जाईल.

**I. साहित्याचा पुरवठा करण्याची मुदत -**

१. पुरवठा आदेश दिल्यानंतर तात्काळ पुरवठा आदेशातील नमूद तांत्रिक वर्णनाप्रमाणे साहित्याचा प्रत्येकी एक नमुना संस्थानचे कॅन्टीन व फायर ॲण्ड सेफ्टी विभागाकडून मान्य करुन घ्यावा लागेल व मान्य नमुन्याप्रमाणेच ६० दिवसांच्या आत मालाचा / साहित्याचा पुरवठा करावा लागेल. प्रसंगी संस्थानच्या गरजेनूसार साहित्याचा मागणीप्रमाणे दुरध्वनीव्दारे / ई-मेलव्दारे कळविलेनुसार पुरवठा करावा लागेल.

२. संस्थानला पुरवठाकालावधीत अगर पुरवठा कालावधी संपल्यानंतरही मंजूर केलेले परिमाणाइतका अगर मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा ५० टक्केपर्यंत जादा साहित्याची मागणी संस्थानकडून झाल्यास त्या साहित्याचा पुरवठा मान्य दरानेच करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

**J. साहित्याचा स्वीकार करण्याची पध्दत-**

१. मागणी केलेले सर्व साहित्य परिशिष्टात BOQ मध्ये दर्शविलेल्या वर्णनाचेच पुरवावे लागेल. कॅन्टीन व फायर ॲण्ड सेफ्टी विभागाने पुरविलेल्या साहित्याची तपासणी केल्यानंतर पुरवठा आदेशाप्रमाणे असल्यासच ते स्विकारले जाईल. वेगळयाच प्रकारचे साहित्य असल्यास ते स्विकारले जाणार नाही. साहित्य स्वीकारले नाही तर ते स्वखर्चाने तात्काळ परत घेवून जाणे आपलेवर बंधनकारक राहील. ते परत न नेल्यास, त्यांचे नुकसान झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

२. ई-निविदेतील मागणी /वर्णनाप्रमाणेच साहित्याचा पुरवठा केलेनंतर त्याप्रमाणेच बिल सादर करावे.

३. मंजूर झालेल्या दराने साहित्याचा पुरवठा करणे पुरवठाधारकांवर बंधनकारक राहील. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ दिली जाणार नाही / मागता येणार नाही.

४. साहित्याची पोहोच पुरवठाधारकाने त्याचे स्वखर्चाने शिरडी येथील संस्थानचे भांडार / कॅन्टीन / फायर ॲण्ड सेफ्टी विभागाकडे पॅकींग व फॉरवर्डींगसह दिली पाहिजे. भांडारात साहित्य उतरविण्याची वाराई (हमाली) पुरवठाधारकास द्यावी लागेल.

५. पुरवठा आदेशाप्रमाणे कंपनीच्या, वर्णनाच्या व नमुना दिलेप्रमाणे साहित्याचा पुरवठा करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित पुरवठादाराची राहील.

**K. बील आदा करण्याची पध्दती-**

१. पुरविलेल्या साहित्याचे बील त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची कॅन्टीन व फायर ॲण्ड सेफ्टी विभागाची खात्री झाल्यावरच त्यांचे अभिप्रायानुसार आदा करणेत येईल. अभिप्राय प्राप्त झालेनंतर ३० दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला बील आदा करण्याचा संस्थानचा प्रयत्न राहिल.

२. सदरपुरवठयापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

३. पुरवठाधारकाने पुरविलेले साहित्य संस्थानने नाकारले व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून साहित्य खरेदी करावे लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर बिलातुन केली जाईल.

४. शासन नियमानुसार लागू असलेले कर कपाती बीलातून करण्यात येतील.

**L. आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

१. पुरवठा आदेशातील साहित्य मुदतीत पुरविले नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या साहित्याची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५०% दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या साहित्याची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५०% दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२. साहित्याचा वेळेत पुरवठा न झाल्यास अगर पुरवठा आदेशाप्रमाणे नसल्यामुळे ते नाकारले गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितके किंवा दिलेल्या आदेशाइतके साहित्य बाजारातून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या साहित्यासाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पूर्वीच्या / नंतरच्या आलेल्या साहित्याच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

३. पुरवठा आदेश दिलेनंतर त्यातील मंजुर दराने साहित्याचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने साहित्याचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा साहित्य पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन साहित्य खरेदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल. तसेच याबाबत संस्थानने घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही.

४. निविदा पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकाच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक साहित्याचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात दरवाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात दरवाढ झाली तरीही मंजूर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर संस्थान जो निर्णय घेईल तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठादाराची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

**M. निविदा वैधता कालावधी-**

१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी ऑनलाईन निविदेच्या शेवटच्या तारखेपासून १२० दिवसांचा राहील.

**N. सर्व साधारण अटी शर्ती**

१. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता / कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

३. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजूर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात साहित्य पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या तेलाच्या ५० टक्के साहित्याचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण साहित्याचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

४. पुरवठादाराने साहित्याचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल अगर याबाबत संस्थान जो निर्णय घेईल तो आपणावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार चालणार नाही.

५. कोणतीही निविदा अंशतः/पूर्णतः स्विकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

६. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

७. तांत्रिक निविदेसोबत संस्थानने ऑनलाईन मागविलेले कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कागदपत्रे ऑनलाईन सादर करु नयेत. त्याचा विचार केला जाणार नाही.

८. खरेदीची ई-निविदा प्रक्रीया ही महाराष्ट्र शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीनुसार राबविण्यात येईल.

९. निविदेतील साहित्याचे Specification बाबत अगर निविदेबाबत काही अधिक माहिती हवी असल्यास कृपया ०२४२३-२५८७७१ अगर ०२४२३-२५८७७२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

१०. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थानने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

(पी.शिवा शंकर, भा.प्र.से.)<br>
मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ----------------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ----------------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ----------------------------------------------------------

ऑफीस- ----------------------------------------------------------

दुकान- ----------------------------------------------------------

निवास- ----------------------------------------------------------

मोबाईल नंबर- ----------------------------------------------------------

फॅक्स नंबर- ----------------------------------------------------------

ई –मेल ----------------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ----------------------------------------------------------

दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- ----------------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे १. ----------------------------------------------------------

२. ----------------------------------------------------------

६. बॅंक खाते नांव १.----------------------------------------------------------

शाखा २. ----------------------------------------------------------

खाते नंबर व प्रकार ३.----------------------------------------------------------

आयएफएससी कोड ४.----------------------------------------------------------

दिनांक :-     /     /२०२३

ठिकाण :-

निविदाधारकाची सही व शिक्का

अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/ स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला
उत्पादक संस्थेचा दाखला/तत्सम परवाना
(उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका)

२. GST नोंदणी दाखला/GST Online Registration Acknowledgement

३. पॅन कार्ड

दिनांक - / /२०२३
ठिकाण -

निविदाधारकाची सही व शिक्का

I/150162/2023

दिनांक- ---------------

प्रति,

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय:- श्री साईबाबा संस्थानचे कॅन्टीन व फायर अॅण्ड सेफ्टी विभागासाठी फर्निचर पुरविणेबाबत ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत नमुद असलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तीचे पालन करणे माझेवर/आमचेवर बंधनकारक राहील.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेले साहित्य आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरीता संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार/ कॅन्टीन / फायर अॅण्ड सेफ्टी विभागाकडे पोहोच करण्याची हमी देतो. वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा ५०% पर्यंत जास्त मालाची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजूर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

ज्या मालाची निविदा मंजूर होईल, त्या मालाचे किंमतीचे ३ % इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजूर झाल्याचे कळविलेनंतर त्वरीत मी/आम्ही रोख भरणा करुन त्याप्रमाणे मंजूर दराने साहित्य शिर्डी येथील भांडार/ कॅन्टीन / फायर अॅण्ड सेफ्टी विभागाकडे पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव | सही/सहया व शिक्का

(१) -

(२) -

सोबत- कागदपत्रे



Signed by
P Siva Shankar
Date: 06-11-2023 16:50:12

I/150133/2023

# FURNITURE MATERIAL BOQ

| Sr.No. | Description | Quantity | Rates Inclusive G.S.T.& all expenses Rs. Ps. (Per Nos.) | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | **Adjustable Bar Stool Chair**<br>Colour – Black<br>Seat Height - 33 Inch<br>Frame & Base Material – Metal<br>Seat Type – Leatherette | 20 Nos. | | |
| 02 | **Nilkamal Plastic Palette for Storage**<br>Colour – Blue / Green<br>Capacity – 100 Kg.<br>Material – HDPE Plastic<br>Dimension – 1200X1000X145 mm | 30 Nos. | | |
| 03 | **Metal Cash Box Drawer**<br>4 coin Money Storage Tray | 20 Nos. | | |
| 04 | **Aluminium Ladder 10 Feet**<br>Foldable Ladder<br>Material – Aluminium<br>Colour – Silver<br>Design – Foldable<br>Height – 10 Ft.<br>Load Capacity – 150 Kg.<br>Ladder – A Type<br>Applical – Industrial | 03 Nos. | | |

(P.Siva Sankar, I.A.S.)
Chief Executive Officer,
Shri Saibaba Sansthan Trust,Shird



Signed by
P Siva Shankar
Date: 06-11-2023 16:49:24